विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या शिफारशी नुसार राज्यात उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था तसेच अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील अध्यापक व प्राचार्यांच्या पदांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत

## महाराष्ट्र शासन

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

### शासन 'शुध्दीपत्रक क्रमांकः संकिर्ण २०१२/(१०५/१२)/विशि-१

मंत्रालय, मुंबई-४०००३२

तारीख: ०९ मे, २०१४

वाचा —

१) शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१०/(५०३/१०)/विशि-१, दिनांक ५ मार्च, २०११

२) शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण २०११/(३९६/११)विशि-१, दिनांक २३ नोव्हेंबर, २०११

३) शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण २०११(३९६/११)विशि-१, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२

प्रस्तावना —

राज्यातील अकृषि विद्यापीठे संलग्नित महाविद्यालये तंत्रशास्त्र विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित पदविका इत्यादी संस्था मधील अध्यापक व प्राचार्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयामध्ये वाढ करण्याबाबत संदर्भाधीन शासननिर्णयान्वये वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

२. उक्त संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ११ (५) मध्ये शासकीय संस्था वगळून उर्वरित संस्थामधील कार्यरत असलेल्या प्राचार्यांना वयाच्या ६२ वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी संस्थेने सदर रिक्त पद भरण्यासाठी वृत्तपत्रात किमान २ वेळा जाहिरात देवून पद भरण्याचे प्रयत्न करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. सदर तरतुदीतून शासकीय महाविद्यालये/संस्थांना वगळण्यात आले होते. शासकीय महाविद्यालय/संस्था यांना सारखेच नियम लागू करणे आवश्यक असल्यामुळे शासकीय महाविद्यालये/संस्थांमधील प्राचार्यांना ६२ वर्षानंतर सेवानिवृत्तीमध्ये मुदतवाढ देण्यापुर्वी सदर रिक्त पद भरण्यापुर्वी वृत्तपत्रात किमान २ वेळा जाहिरात देवून पद भरण्याचे प्रयत्न करण्याची अट लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

## शासन शुध्दीपत्रक

३. वर प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीच्या मुदतवाढीसंदर्भातील धोरणात शासन पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे. संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ५ मार्च, २०११ च्या

शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ११ (५) मधील " शासकीय संस्था व्यतिरिक्त उर्वरित संस्थांमधील" हे शब्द वगळण्यात येत असून त्याएवेजी " शासकीय महाविद्यालये/ संस्था आणि अशासकीय अनुदानित महाविद्यालये/संस्था मधील " या शब्दाचा समावेश करण्यात येत आहे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०५०६१५१३२३४८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vikas Thulshiram Kadam

Digitally signed by Vikas Thulshiram Kadam
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher & Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vikas Thulshiram Kadam
Date: 2014.05.20 11:36:19 +05'30'

विकास तु. कदम

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 GRAM : UNISHIVAJI
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९११३६)
तार : युनिशिवाजी फॅक्स : ००९१-०२३१-२६९३२९४, २६९१५३३ व २६९२३३३.
E-mail Address – affiliationt1@unishivaji.ac.in

B Accredited By NAAC

जा.क्र. संलग्नता/टे.१/एनएल / ३० दिनांक : 5 JUN 2014

प्राचार्य, संलग्न महाविद्यालये व संचालक, मान्यताप्राप्त शिक्षणसंस्था यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,

सदरचे पत्र/परिपत्रक/शासन निर्णय विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर BCUD-Circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.